# Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal

# Department of Economics 2025-26

## Silver Jubilee Programme

## Report of

## G.K. Test for 12th Class Students

### Date : 17th Dec. 2025

On the occasion of the Silver Jubilee of *Shrimati Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal*, a General Knowledge Competition was organized on 17 December 2025 at *Param Pujya Ramchandra Maharaj Junior College, Khairgaon*. The objective of this competition was to enhance the intellectual abilities of students and to increase their general knowledge.

Students from the Arts and Science streams of Class XII participated enthusiastically and actively in the competition. A general knowledge examination of 50 marks was conducted for the participants. The meritorious students in the competition were honored as follows:

- **Arts Stream**

First Prize: Miss Neha Bhorkade (₹151, Memento, and Certificate)
Second Prize: Gaurav Dhurve (₹100, Memento, and Certificate)

- **Science Stream**

First Prize: Miss Kumari Sonakshi Aratpayre (₹151, Memento, and Certificate)
Second Prize: Manish Gedam (₹100, Memento, and Certificate)

In addition, all participating students were awarded participation certificates.

Program contributed to enhancing the knowledge of the students, boosting their confidence, and encouraging a competitive spirit among them. The organizers and all those who contributed to the successful execution of the event were sincerely thanked. The General Knowledge Competition proved to be highly beneficial for students, and it was suggested that such competitions should be organized regularly in the future.

**Photo's**


श्रीमली नानकीवाई वाधवानी
कला महाविद्यालय, यवतमाळ
अर्थशास्त्र विभाग
NAAC


श्रीमती नातकीबाई वाधवानी
कला महाविद्यालय, यवतमाळ
अर्थशास्त्र विभाग
NAAC






श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ

अर्थशास्त्र विभाग

(रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित)

''सामान्य ज्ञान स्पर्धा''

स्थळ:– प. पु. डॉ. रामचंद्र महाराज कला व विज्ञान उच्च माध्यमीक आश्रमशाळा, खैरगाव (कासार)

—:प्रमाणपत्र:—

प्रमाणीत करण्यात येते की, ______________________________

यांनी दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धेत सहभाग घेतला. त्यांनी कला/विज्ञान शाखेतून प्रथम/द्वितीय क्रमांक प्राप्त केल्या बद्दल प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येत आहे.

त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा!

| डॉ. जयंत चतुर | श्री एम.व्ही. नल्लावार | डॉ. संजय राचलवार |
|---|---|---|
| प्राचार्य | उच्च माध्यमीक मुख्याध्यापक | समन्वयक |
| श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ | प. पु. डॉ. रामचंद्र महाराज कला व विज्ञान उच्च माध्यमीक आश्रमशाळा, खैरगाव (कासार) | श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ |

**News**

सर्वाधिक खपाचे लोकप्रिय दैनिक

# नमो महाराष्ट्र

मंगळवार, ७ एप्रिल २०२६ • वर्ष ५० • अंक ११२ • रु. ३ • संस्थापक संपादक : स्व. बाळासाहेब पुंडखेडकर • मुख्य संपादक : विने

( नमो महाराष्ट्र

दि ०७/०४/२०२६

# यवतमाळात रौप्य महोत्सवानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा उत्साहात

**नमो महाराष्ट्र । प्रतिनिधी**




**यवतमाळ** : यवतमाळ जिल्हा विकास समिती संचलित श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळ यांच्या रौप्य महोत्सवानिमित्त अर्थशास्त्र विभागाच्या वतीने परमपूज्य रामचंद्र महाराज ज्युनिअर कॉलेज, खैरगाव येथे विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास व सामान्य ज्ञानात वाढ व्हावी या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत बारावीच्या कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी ५० गुणांची सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली. स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कला शाखेत कु. नेहा भोरकडे हिने प्रथम, तर गौरव धुर्वे याने द्वितीय क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेत कु. कुमारी सोनाक्षी अरतपायरे हिने प्रथम, तर मनीष गेडाम याने द्वितीय क्रमांक मिळविला. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांचा आत्मविश्वास वाढला असून स्पर्धात्मक वृत्तीला चालना मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल आयोजक व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानण्यात आले. तसेच भविष्यात अशा स्पर्धांचे नियमित आयोजन करण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.

लोकप्रिय सांध्य दैनिक yavatmalmarmik@gmail.com
यवतमाळ मार्मिक
संपादक : विनोद पुईखेडकर सहसंपादक : पंजाब गजभिये

# ज्ञानस्पर्धेतून उजळले विद्यार्थ्यांचे कौशल्य

## खैरगावात सामान्य ज्ञान स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

•यवतमाळ मार्मिक, प्रतिनिधी

**यवतमाळ, ता. ६ :** विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देत सामान्य ज्ञानाचा पाया भक्कम करण्याच्या उद्देशाने खैरगाव येथे पार पडलेल्या स्पर्धेत बारावीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होत स्पर्धात्मक वृत्तीला नवे बळ मिळाल्याचे चित्र दिसून आले.

यवतमाळ जिल्हा विकास समिती संचालित श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळ यांच्या रौप्य महोत्सवानिमित्त अर्थशास्त्र विभागाच्या पुढाकारातून परमपूज्य रामचंद्र महाराज ज्युनिअर कॉलेज, खैरगाव येथे सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बारावीच्या कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत आपली बौद्धिक क्षमता आजमावली.

५० गुणांच्या लेखी परीक्षेतून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात आले.




स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कला शाखेत कु. नेहा भोरकडे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर गौरव धुर्वे याने द्वितीय स्थान मिळविले. विज्ञान शाखेत कु. सोनाक्षी अरतपायरे हिने प्रथम क्रमांक मिळवित आपली गुणवत्ता सिद्ध केली, तर मनीष गेडाम याने द्वितीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली असून त्यांचा आत्मविश्वास उंचावल्याचे दिसून आले.

■ **कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आयोजकांनी घेतलेले परिश्रम उल्लेखनीय ठरले. भविष्यातही अशा स्पर्धांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.**